Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 2 रे • अंक : 3 रा
एप्रिल – जून 2023
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

## संपादकीय ...

भारतीय परंपरेनुसार नवीन वर्ष हे गुढीपाडव्यापासून सुरु होते. 2023–24 हे आर्थिक वर्ष नुकतेच सुरु झाले आहे. या नवीन वर्षाच्या सर्वाना शुभेच्छा. हे संवत्सर सर्वाना सुखाचे आनंदाचे आणि उत्कर्षाचे जावो ही सदिच्छा!

ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या वैद्यकीय, सामाजिक, भावनिक आणि मानसिक आरोग्याच्या आव्हानामुळे वृद्धांसाठी समाजसेवा करणाऱ्या स्वयंसेवकांनी जेष्ठ नागरिकांना आवश्यक तिथे समुपदेशन करणे तसेच त्यांच्या कुटुंबियांना जेष्ठांना सर्वोत्तम मदत कशी करावी याबद्दल सल्ला देऊन, जेष्ठ नागरिक व त्यांचे कुटुंबीय यांच्यात संवादाचा पूल म्हणून काम करणे आवश्यक आहे आणि हे काम विशेषतः वृद्धाश्रमात राहणारे ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या कुटुंबीय यांच्यासाठी आवश्यक आहे. आमचे स्वयंसेवक असे संवादाचे पूल म्हणून काम करण्याचा प्रयत्न करीत असतात. वृद्धांबाबतच्या काळजीमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांच्या सेवाभावी वृत्ती मुळे ते वृद्ध आणि त्यांचे कुटुंबीय यांच्याशी आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतात आणि त्याच्या कामाचा थेट सकारात्मक परिणाम त्यांच्यावर होतो. अशी अनेक उदाहरणे आमच्या स्वयंसेवकांबाबत घडलेली आहेत.

जेष्ठ नागरिकांच्या दृष्टीने एक चांगली गोष्ट या वर्षीच्या युनियन बजेट मध्ये अर्थमंत्र्यांनी जाहीर केली, ती म्हणजे सिनियर सिटीझन सेव्हींग्ज योजनेत गुंतवणूक करण्यासाठी जी 15 लाख रुपयांची मर्यादा होती ती दुप्पट करण्यात येऊन ती तीस लाखांवर नेण्यात आली आहे तसेच त्याचा व्याजदरात वाढ करण्यात आली आहे. एक एप्रिल पासून या योजनेत पैसे गुंतविल्यास 8. 20% एवढे व्याज जेष्ठ नागरिकांना मिळू शकेल. तसेच पोस्ट ऑफिसच्या मासिक व्याज ठेव योजनेत आत्तापर्यंत जास्तीत जास्त साडेचार लाख रुपये गुंतविता येत होते. आता या योजनेत नऊ लाख एवढी रक्कम गुंतविता येणार आहे तसेच मासिक व्याज ठेव योजनेत जर खाते संयुक्त नावाने असेल तर या योजनेत 15 लाखापर्यंत रक्कम गुंतविता येईल. नवीन टॅक्स रेजिम नुसार सात लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही आयकर भरावा लागणार नाही आणि याशिवाय पेन्शनर्स जरी नवीन पदतीने टॅक्स रिटर्न भरीत असले तरीही त्यांना स्टँडर्ड डिडक्शन चा लाभ घेता येणार आहे.

गेल्या महिन्यात आमच्या संस्थेला अभिमान वाटावा अशी घटना घडली आहे. आमच्या बिंदू टीम चे एक सदस्य श्री अभिजित माळी यांच्यावर तयार केलेल्या एका फिल्मला पुण्यात झालेल्या Socio कॉर्पो CSR फिल्म फेस्टिवल मध्ये सर्वांगीण दिव्यांग सक्षमीकरण वर्गवारीत सर्वोत्कृष्ट फिल्म चे पारितोषिक मिळाले. या फिल्मचे दिग्दर्शन माया केअर च्या व्यवस्थापकीय संचालिका सौ.मंजिरी गोखले–जोशी यांनी केले आहे.श्री माळी हे सांगली जिल्यातील आटपाडी या छोट्या गावातील तरुण असून त्यांना अपघात झाल्याने त्यांच्या मज्जासंस्थेला दुखापत झाली व त्याचा छाती खालील भाग कमजोर पडला तेव्हा त्यांना मायाकेअरने आपल्या बिंदू टीम मध्ये नोकरी देऊन त्यांना रोजगार निर्मिती करून दिली आहे आणि याबाबतची हि फिल्म आहे. माया केअर मधील इतर दिव्यांग सदस्य कसे आत्मविश्वासाने वृद्धसेवेचे काम हाताळतात हेही या फिल्म मध्ये दाखवण्यात आले आहे.

गेल्या तीन महिन्यात आम्ही मायाकेअर ही संस्था जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी यासाठी मोहीम हाती घेतली होती. व्हॉट्सअॅप, फेसबुक यासारख्या माध्यमातून प्रयत्न केलेच पण त्याचबरोबर स्टँडी उभी करणे ,मोठ्या दुकानांमधून पत्रके लावणे, रिक्षाच्या मागे पत्रके चिकटवणे इत्यादी उपाय गोष्टी केल्याने मोठ्या प्रमाणांत प्रसिद्धी मिळाली आणि त्यामुळेच वृद्धांच्या सेवेसाठीच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे तसेच मायाकेअर चे स्वयंसेवक होण्यासाठी मोठ्या संख्येने विचारणा होत आहे ही समाधानाची बाब आहे.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

मी शैलजा दीक्षित , मी  अमेरिकेला जाणार होते .मला खूप टेन्शन आलं होतं .पण मायाकेअर स्वयंसेविका डॉ. सुवर्णा ताई  आगटे यांनी आदल्या दिवशी  सकाळी धीर दिला की मी तुझ्याशी गप्पा मारायला येते. त्या आल्या आणि त्यामुळे मी खूप रिलॅक्स झाले माझ मन शांत झालं.  त्यामुळे मला अमेरिकेला जायला उत्साह आला आणि टेन्शनही कमी झालं . त्यामुळे त्यांची मी खूप आभारी आहे. त्यांना धन्यवाद देते . त्यांनी मला मनाची शांतता मिळवून दिली त्यामुळे मला खूप बर वाटलं.

– शैलजा दीक्षित पुणे फोन: **9604873586.**

***

माया केअर तर्फे स्वयंसेवक महेश कुलकर्णी हे माझ्या वडिलांना दर आठवड्याला भेटायला येतात त्यांच्याशी विविध विषयांवर गप्पा मारतात. मी आणि माझी दोन्ही भावंडे अमेरिकेला असतो.  माझ्या वडिलांना त्यांच्याबद्दल एक विश्वास निर्माण झाला आहे. आणि त्यातच   माया केअरचे यश आहे. काही दिवसापूर्वी त्यांना चालता येत नसल्यामुळे दीनानाथ  मंगेशकर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट  करावं लागलं तेव्हा महेश सरांनी संपूर्ण जबाबदारी घेऊन हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन   करणे,  त्यांच्यासोबत बसून  डॉक्टर काय औषधे देत आहेत  आणि कोणत्या टेस्ट करीत आहेत  हे आम्हाला फोनवर सांगणे , ही सगळी जबाबदारी घेतली, माझी बहीण भारतात येईपर्यंत आम्ही निर्धास्त होतो. त्यामुळे मी माझ्या कुटुंबीयांतर्फे महेश कुलकर्णी यांचे  खूप आभार मानते. तुमच्याकडे असे स्वयंसेवक आहेत ही  खूप चांगली गोष्ट आहे.

नीता नाईक , बोस्टन, अमेरिका फोन: **001-508-361-4858**

***

Myself  Niranjan Gadgil. I stay and work at Tokyo, Japan.My mother is at Aple Ghar Elderly care home Karvenagar, Pune. MayaCare volunteer Smt Vinita Mahajan visits my mother at least once a week and recites shloka for her. My mother is very happy with this interaction on regular basis and always waits eagerly for VinitaTai. I appreciate this selfless service extended to her by Vinita  tai on behalf of  Mayacare NGO.

**Shri Niranjan Gadgil , Tokyo, Japan Phone:** +81-90-9143-9802

***

मी शशिकांत जोगळेकर. मी आणि माझी पत्नी  बिबवेवाडी पुणे येथे राहतो. माया केअर चे स्वयंसेवक संतोष महाजन मला नेहमी खूप चांगली मदत करतात. मला हॉस्पिटलला घेऊन जाणे, गरज असल्यास किराणा माल आणून देणे इत्यादी कामे ते अतिशय प्रेमाने करतात. ते अतिशय वक्तशीर आहेत. तसेच माझ्या पत्नीला स्वयंसेविका प्रियांका लिखिते मदत करतात.तिला हॉस्पिटलमध्ये जाण्यास सोबत करतात . मायाकेअर च्या सेवा अतिशय उत्तम आहेत. त्या ज्येष्ठांनी  जरूर   घ्याव्यात अशी मी शिफारस करतो.

शशिकांत जोगळेकर  फोन: **9226892294**

***

माझे वय **74** वर्ष आहे. मी नागपूर येथील वानप्रस्थ वृद्धाश्रमांमध्ये राहतो.एके दिवशी मला  हॉस्पिटलमध्ये जायचे होते. त्यामुळे मी मायाकेअर चे नागपूर समन्वयक रामदास कामडी यांच्याकडे मदत मागितली.त्यांनी लगेचच माझ्यासाठी श्री.निलेश ठाणेकर या स्वयंसेवकाला पाठवले व मला हॉस्पिटलमध्ये पोहोचवले.परंतु त्यांचे **15** मिनिटांचे गोड शब्द ऐकून माझ्या प्रकृतीमध्ये कसा काय सुधार झाला हे मलाही कळले नाही.आपल्या संस्थेमध्ये अपंग लोक आणि स्वयंसेवक  कशाप्रकारे ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी धावपळ करतात हे मी स्वतः अनुभवले आहे. आपले काम कौतुकास्पद आहे.आपण  आमच्यासारख्या जेष्ठ नागरिकांसाठी  करत असणारी समाजसेवा खरोखरच अतुलनीय आहे . शतश:आभार.

– शांतारामजी तालेवार नागपूर फोन : **8552964894**

***

# निधन वार्ता

**आम्ही सेवा देत असलेल्या खालील ज्येष्ठ नागरिकांचे दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**



• श्री दिगंबर लाळे •

• श्री अभय सोमण •

• श्रीमती आशालता ताई अभंग •



# माया केअर वृत्त

1) दि. 15 फेब्रुवारी 2023 रोजी आनंदी वृद्धाश्रम गुलाबनगर धनकवडी येथे मायाकेअर च्या सेवांची माहिती देण्यात आली. यावेळी स्वयंसेविका प्रियांका लिखीते आणि स्वयंसेवक महेश कुलकर्णी उपस्थित होते.

2) दि. 25 फेब्रुवारी 2023 रोजी आनंदयात्री या एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या समूहाच्या सभेत राजा मंत्री उद्यान एरंडवणे, पुणे येथे मायाकेअर च्या सेवांची माहिती देण्यात आली. यासाठी स्वयंसेविका ज्योती कदम यांनी पुढाकार घेतला. स्वयंसेवक महेश कुलकर्णी हेही उपस्थित होते.

3) दि. 8 मार्च 2023 रोजी महिला दिनानिमित्त वेदांत भवन कर्वेनगर येथे एका कार्यक्रमात स्वयंसेविका विनिता महाजन यांनी माया केअर च्या सेवांची माहिती दिली.

4) दि. 20 फेब्रुवारी 2023 रोजी डॉ. सुरेश गोखले यांनी वृद्धांना उपयुक्त व्यायाम आणि प्राणायाम या विषयी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. हे व्यायाम स्वयंसेवकांनी वृद्ध लाभार्थ्यांकडून करून घ्यावेत असा सल्ला देण्यात आला. स्वयंसेवक विद्याधर जोशी यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम घेण्यात आला. सुमारे 6 स्वयंसेवक यावेळी उपस्थित होते.

5) नारायण सेवा संस्थान उदयपूर राजस्थान येथे दिव्यांग विवाह समारंभात मायाकेअर च्या सेवांची माहिती उपस्थितांना स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर यांनी दिली. उदयपूर येथील मायाकेअर चे स्वयंसेवक श्री. सोळंकी यांना कामाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

6) रंगवर्षा हॉल टिळक रोड पुणे येथे केतकर कुलवृत्तांत संमेलनामध्ये मायाकेअर ची माहिती उपस्थितांना स्वयंसेवक श्री अनिल नातू यांनी दिली. यावेळी श्री मकरंद निमोणकर व विनिता महाजन उपस्थित होत्या.

7) नांदेड सिटी पुणे येथे रा.स्व.संघाच्या स्वयंसेवकांना मायाकेअर ची माहिती देण्यात आली.

8) नांदेड सिटी पुणे येथे Benz वृद्धाश्रमात मायाकेअरची माहिती देण्यात आली.

9) निवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री उपरे, LIC पुणे यांच्या धार्मिक कार्यक्रमात उपस्थितांना मायाकेअर ची माहिती देण्यात आली.

10) नूमवि माजी विद्यार्थ्यांच्या मासिक सभेमध्ये मायाकेअर च्या सेवांची माहिती देण्यात आली यावेळी 75 माजी विद्यार्थी उपस्थित होते.

11) दि 30 मार्च 2023 रोजी गणंजय सोसायटी कोथरूड, पुणे येथे झालेल्या रामनवमी कार्यक्रमाच्या वेळी उपस्थितांना मायाकेअरच्या सेवांची माहिती देण्यात आली. यावेळी संतोष महाजन, विनिता महाजन आणि महेश कुलकर्णी हे स्वयंसेवक उपस्थित होते.

# पुणे परिसरातील वृद्धाश्रमांची माहिती

| | | |
|---|---|---|
| जनसेवा फाऊंडेशन संचलित वृद्धाश्रम<br>आंबी रानवडी, पानशेत, पुणे<br>फोन : (020) 24538787 | माहेरवाट<br>गणेशनगर - मुक्ताई गार्डन समोर,<br>वडगाव धायरी, पुणे- 411041<br>फोन : (020) 24392623 | वानप्रस्थाश्रम यशोधाम सभागृह<br>चौकजवळ, 20/ए तपोधाम वसाहत,<br>तळेगाव दाभाडे, पुणे -410507<br>फोन :(02114)225768 |
| तपोधाम साधकाश्रम<br>तपोधाम-वारजे, पुणे-411058<br>फोन :(020)25230682 | दादासाहेब नाटेकर मोरया ट्रस्टचा<br>आश्रम वृध्दाश्रम मु.पो. चिखली,<br>ता.हवेली, आळंदी, पुणे-411062<br>फोन-8380015575 | अग्रसेन वृध्दाश्रम ई 5/2, पाप्युलर<br>प्रेस्टिज सोसायटी, 141, वारजेनाका,<br>हॉटेल यशोदीप शेजारी, पुणे-411052<br>फोन :(020)26126460, 25237444 |
| ए. जे. फाऊंडेशन<br>विशालनगर जवळ, पिंपळे निलख,<br>जगताप डेअरी, पुणे<br>मोबा. 9921059898 | ओलावा ज्येष्ठ नागरिक सहनिवास<br>मु. गोळेवाडी, ता.डोणजे,<br>सिंहगड पायथा, पुणे<br>फोन- 9325219813 | सिद्धी वृद्धाश्रम शिवनेरी सोसायटी,<br>हडपसर, उषाकिरण हॉस्टेलशेजारी,<br>पुणे- 411028 फोन: 9552395729,<br>9763706901 |
| आभाळमाया<br>डॉ. अपर्णा माणिकबाग<br>पुणे- 411051<br>मोबा. 7757071093 | स्नेह् वानप्रस्थाश्रम<br>राजगुरूनगर (खेड)<br>जि. पुणे<br>मोबा. 9767599884 | आपुलकी वृद्धाश्रम<br>सिहंगड पायथा, डोणजे, पुणे<br>फोन: 9657073396 |
| पिताश्री वृद्धाश्रम<br>भाग्योदय नगर, कोंढवा खुर्द,<br>स.न. 55, पुणे -411048<br>फोन: (020) 26931066 | सार्थक वृध्दाश्रम<br>मु. गोळेवाडी, ता. डोणजेगाव,<br>सिंहगड पायथा, पुणे<br>मोबा.9623966441 | सेवाधाम वृद्धाश्रम<br>गोळेवाडी, डोणजे गाव,<br>प्रतिका पायगुडे<br>फोन: 9370331218 |
| अथश्री 132/2, पाषाण,<br>बाणेर रोड, पुणे- 21<br>फोन:( 020)25862322,<br>25861132 | त्रिमूर्ती होम्स नवसह्याद्रीसोसायटी,<br>कर्वेनगर, पुणे- 411052<br>फोन: (020)2542177<br>मोबा. 9422318411 | प्रा.ग.प्र. प्रधान वृद्धाश्रम<br>तुकाई टेकडी, हडपसर, पुणे<br>मो. 9922875648,9850032993, |
| सनवर्ल्ड फॉर सिनीयर्स (वृध्दनिवास )<br>मु.पो. खानापूर, डोणजे- पानशेत रस्ता,<br>पाण्याच्या टाकीजवळ, खानापूर,<br>पुणे 411025 मोबा. 9421081181 | श्रीस्वामी समर्थ आधारवडवृध्दाश्रम<br>वाणेवाडी, ता. बारामती, जि. पुणे<br>श्री. शिंदे- 9767771414,<br>8805515502 | देवतरू ज्येष्ठांचे घरकुल<br>133/बी 1, प्लॉट नं. 587/3,<br>युनियन बँकेजवळ, सिंहगड रोड, पुणे- 30<br>7030211775/9850904858 |
| मातोश्री वृद्धाश्रम कर्वेनगर,<br>विठ्ठल मंदिराजवळ,राजाराम पुलाजवळ,<br>कर्वेनगर, पुणे 411052<br>फोन:(020) 25412375 | वृद्धनिवास<br>चंदननगर, खराडी नगर रोड, पुणे<br>फोन. (020) 27012464,<br>39632299 | शांतीबन केअर सेंटर<br>83/2/5, ओकारी रेसिडेंसी, 104,<br>दांगट पाटील नगर, एन.डी.ए. रोड पुणे<br>9130822812, 91308222912 |
| मधुरभाव ओल्डएज होम,<br>ए.जे. होम केअर सर्व्हिस, समर्थ कॉलनी,<br>विशालनगर, अँपल हॉस्पिटल समोर,<br>पिंपळे निलख, पुणे- 41027<br>(अनुजा देवधर) 9921059898 | शिवगंगा वृद्धाश्रम<br>माउलीनगर, कामशेत, नाणेरोड,<br>ता. मावळ, जि.पुणे- 410475<br>मो. 9422316244 | जिव्हाळा वृद्धाश्रम<br>वटेश्वर मंदिराजवळ, नारायणपूर रोड,<br>सासवड, जि. पुणे<br>9822028983, 9011533651 |

# एक स्वयंसेविकेचा अनुभव –

गेल्या वर्षी एक 70 वर्षाच्या ज्येष्ठ महिलेची गाठ पडली. मी त्यांना मायाकेअर फाऊंडेशनची माहिती सांगितली व मदत करण्याचे आश्वासन दिले ( नाव बदलून– सुरेखा कुलकर्णी ) . करोना काळात त्यांचे पती निधन पावले. सुरेखाताईंची कॅन्सरची 3 ऑपरेशन्स झाली होती.  तसंच 10 वर्षे आधी बाय पास होऊन त्यांच्या  हृदयाचा व्हॉल्वही बदलला होता. आणि आता हे अचानक संकट कोसळले.

त्यांना एकच मुलगी बडोद्याला असते. तिलाहि  कॅन्सर झाला.मी सुरेखाताई ना धीर देत– माया केअर तर्फे सिटी पोस्टात हेलपाटे घालून  त्यांचे बंद पडलेले पोस्टाचे खाते सुरु करून दिले. पतीची पेन्शन सुरु करण्यासाठी त्यांना मदत केली. त्यांच्या फोनचे पोस्ट–पेडचे  प्रीपेड रिचार्ज बदलून दिले. त्या जरा सावरू लागल्या पण त्यांना दम लागू लागला. अगदी 4 पावलेही चालणे अशक्य झाले. मग त्यांना cardiologist कडे नेले. तर त्यांनी पूर्वीचा व्हॉल्व्ह खराब झाला असल्याने परत बदलावा लागेल. असा सल्ला दिला. पुण्यातच सर्व टेस्ट करून , कंसल्टंटच्या  साहाय्याने व त्यांच्या मुलीलाही सर्व समजावून सांगितले व ऑपरेशनची आवश्यकता असल्याचे पटवून दिले. तोपर्यंत तात्पुरती औषध योजना चालू केली.

पुण्यात कोणतेही मनुष्यबळ नसल्याने  त्याचा जावई येऊन त्यांना बडोद्याला घेऊन गेला. व तिथे फेब्रुवारी 23 मध्ये त्यांचे व्हॉल्व्ह बदलण्याचेही ऑपरेशन सुखरूप पार पडले. वेळोवेळी त्यांना लागेल तसे साहाय्य मायाकेअर तर्फे मिळाल्याने त्यांना शारीरिक व मानसिक ही आधार मिळत गेला. आता त्यांचं स्वास्थ्य सुधारत आहे. त्या फोन करून  मला  आपल्या प्रकृतीतील   सुधारणा वेळोवेळी कळवतात.

तसेच त्यांनी माया केअर फाउंडेशन ला 5000 रु. देणगी देखील दिली आहे. माया केअर फाउंडेशनच्या त्या अतिशय ऋणी आहेत.

डॉ. सुवर्णा वासुदेव आगटे
कोथरूड, पुणे. फोन : 9881546250

***

# निवारा वृद्धाभ्यास केंद्र आणि सेवा

डेव्हिड ससून इन्फर्म असायलम (निवारा ) या 159 वर्षे वृद्धसेवेत कार्यरत असलेल्या  पुण्यातील संस्थेने वृद्धाभ्यास केंद्र (Gerontology) सुरु केले आहे. या केंद्रा अंतर्गत समाजामध्ये राहणाऱ्या वृद्धांसाठी विना मोबदला पुढील सेवा उपलब्ध आहेत –

1) इच्छापत्र व वैद्यकीय इच्छापत्र (शनिवारी सकाळी 10 ते 12)
2) स्वाधार या समुपदेशनात अग्रगण्य असलेल्या संस्थेच्या सहाय्याने समुपदेशन केले जाईल. (शुक्रवारी दुपारी 4 ते 6)
3) वृद्धांसाठी सरकारी योजनांची माहिती.
4) ज्येष्ठ नागरिकांसाठी बँक योजना.
5) पोलिसांच्या भरोसा या विभागातर्फ़े ज्येष्ठांसाठीच्या सुविधा.

संपर्क : डेव्हिड ससून इन्फर्म असायलम , 96,  नवी पेठ, पुणे 30.
फोन : 9579744635, 020–24538429, 24539003

***.

# एक संगीत मैफल आजी आजोबांसाठी !



माया केअर फाउंडेशन च्या वतीने दिनांक 26 मार्च 2023 रोजी वात्सल्य वृद्धाश्रम नाशिक येथे गाण्यांच्या सुरेल  मैफिलीचा कार्यक्रम संपन्न झाला. माननीय यशवंत खाडिलकर सर यांच्या शास्त्रीय गायनाचा अनुपम संगम सर्व वृद्धांना अनुभवायला मिळाला. मोहन लेले यांनी हार्मोनियम, प्रकाश गाडे यांनी तबला, तसेच भगवान खंजोळी यांनी टाळ वादन करून गाण्यांच्या या मैफिलीला अधिक तालमय बनवले.

सर्व गायन व वादन वृंदाचा  पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माया केअर स्वयंसेवक भाग्यश्री पवार, सुयोग खेडलेकर,बापूजी तिवडे,शुभदा दाणी , अंजली गाडे, साहेबराव कांगुणे , गायत्री लचके आणि  भाग्यश्री चौधरी उपस्थित होते. सर्व उपस्थित वृद्धाश्रमातील आजी आणि आजोबांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला. वात्सल्य वृद्धाश्रमातर्फे खाडिलकर सरांना सन्मानचिन्ह देण्यात आले तसेच माया केअर फाउंडेशन तर्फे खाडीलकर सरांना कॉफी मग आठवण म्हणून भेट स्वरूपात देण्यात आला.



अमरावती येथील आमचे स्वयंसेवक गजानन शिरसाट हे रामपुरी गोस्वामी यांना बँकेमध्ये मदत करत असताना.



सांगलीचे वसंत कुलकर्णी यांना आमचे स्वयंसेवक साहेब मुल्ला हे सोबत करत असताना.



धुळे येथील आमच्या स्वयंसेविका सुलताना शहा या नामदेव साळुंखे यांना मोबाईल शिकवत असताना.



आमच्या वर्धा येथील स्वयंसेविका सीमा झाडे या शांताबाई यांना भगवदगीतेचे वाचन करून दाखवत असताना




आमचे जळगावचे स्वयंसेवक ज्ञानदीप पाटील हे भारतीबाई पाटील यांना बँकेमध्ये स्लिप भरण्यास मदत करत असताना.



आमचे अहमदनगरचे स्वयंसेवक सुनील ढलपे हे ज्येष्ठ लाभार्थ्यांना माया केअर दिनदर्शिका भेट देत असताना.



सोलापूर येथील आमच्या स्वयंसेविका सीता बनसोडे या लता क्षीरसागर यांना त्यांच्या औषध गोळ्या पोहोच करत असताना..



आमच्या पुण्याच्या स्वयंसेविका डॉ. सुवर्णा आगटे या ज्योती मांडे यांना स्तोत्र वाचन करण्यासाठी मदत करत असताना



आपले घर वृद्धाश्रम पुणे येथील ज्येष्ठांशी संवाद साधताना
आमच्या स्वयंसेविका विनिता महाजन.



पुणे येथील श्रीमती
शेणोलीकर यांना त्यांच्या
आजारपणात सोबत
करत असताना आमच्या
स्वयंसेविका वीणा जोग.




दुसऱ्या Socio CSR
फिल्म महोत्सवात अभिजीत
माळी या बिंदू टीम
सदस्याच्या फिल्मला
पारितोषिक मिळाले.



पुणे येथील रत्नमाला
तीवटाणे यांच्यासोबत
मनोरंजक खेळ खेळत
असताना आमच्या स्वयंसेविका
पूजा चव्हाण.



मुंबई येथे विविध
हॉस्पिटलमध्ये माया केअर
जनजागृती कार्यक्रम करत
असताना आमच्या स्वयंसेविका
मुसरत मोमीन.



मुंबई येथील रिक्षा चालकांना माया केअर कडून विविध वस्तू भेट
देऊन जनजागृती करताना आमचे स्वयंसेवक किशोर दर्शन.



मुंबईतील दीपचंद शर्मा यांना कागदपत्र संदर्भात मदत करत
असताना आमचे स्वयंसेवक आमिनाली पंजवानी.



पुणे येथील सुमित्रा
नाडकर्णी यांच्यासोबत
वेळ घालवताना आमच्या
स्वयंसेविका अरुणा
अवत्रमणी

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

✻ **सेवा** ✻

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

**MAYA CARE NATIONAL HELPLINE :- 1800 572 1343**

| CITY | FOR WHATSAPP |
| --- | --- |
| Nashik, Parbhani, Ahmednagar, Jalna, Jalgaon, Dhule, Wardha, Mumbai, Sangli, Yavatmal, Nagpur, Nandurbar, Pune, Satara, Amravati, Chandrapur, Solapur, Akola, Buldhana, Kolhapur, Aurangabad ,Beed | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

Merchant Name : **MAYA CARE FOUNDATION**
Mobile Number : **7721053535**

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875** **Toll Free: 1-800-572-1343.**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
**1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,**
**सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.**
केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

**TO,**

श्री/श्रीमती ______________________